स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड . संलग्नित

हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा. द्वारा संचालित

# आझाद महविद्यालय,औसा.जि.लातूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारा आयोजित

## नियमित कार्यक्रम अहवाल - 2025-26

### दि.01 एप्रिल ते 31 मार्च 2026


| डॉ.अफसर शेख | डॉ. पांडुरंग आचोले | डॉ. मजहर कोतवाल | डॉ.दादासाहेब तोटे |
|---|---|---|---|
| प्राचार्य | उपप्राचार्य | कार्यक्रमाधिकारी | कार्यक्रमाधिकारी |


Scanned with OKEN Scanner

Reg.No. OSM/36/78 F 312 L
Hindustani Education Society's
**AZAD MAHAVIDYALAYA, AUSA**
Afsar Nagar, Ausa Tq.Ausa Dist.Latur
Affiliated To S.R.T.M.University Nanded, NAAC accrediated B+

संस्था.नोंदणी क्र.OSM/36/78 F 312 L
हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे
**आझाद महाविद्यालय, औसा**
अफसर नगर, औसा ता.औसा जि.लातूर
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड संलग्नीत, नॅक प्रमाणित बी + दर्जा प्राप्त

जा.क्र. AMA/NSS/2026-27/217 दिनांक. 29/08/2026

प्रति,

मा. संचालक साहेब,

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

स्वा.रा.ती मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

विषय : शैक्षणिक वर्ष 2025-26 चे नियमित कार्यक्रमाचे लेखे / अंकेक्षण अहवाल स्वीकारणे बाबत :

महोदय,

वरील विषयी विनंती कि आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील शैक्षणिक वर्ष 2025-26, (**1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026**)या कालावधीचे नियमित कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे लेखे अंकेक्षण सादर करीत आहोत,

तरी मा. साहेबानी सदरील अहवाल स्वीकृत करून उपकृत करावे.

ही नम्र विनंती.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

## NATIONAL SERVICES SCHEME NSS REGULAR SCHEME
## UTILIZATION CERTIFICATE

Certified that account of expenditure Grant–in-Aid of Rs.54,000/- during the year 2025-26 in favor of the Principal, AZAD MAHAVIDYALAYA,AUSA.DIST. LATUR. out of which received during the year is Rs.27000/- Regular Activities have been audited by me with reference to the voucher and books of accounts and the norms of expenditure and relevant guidelines thereto, a statement of accounts of the NSS Regular Activities duly signed by me is enclosed. It is therefore hereby certified. *(Subject to the remarks appended herewith if any) that the amount of Rs.61,500/- has been expended by the college for implementation of NSS Regular Activities in accordance with the terms & conditions and guidelines laid down for the purpose and the balance of Rs.0 is not yet refunded.

1. Cash Books Checked
2. Ledger Checked
3. Voucher Checked
4. Stock Register Checked
5. Audit Observation – Expense is supported by Homemade vouchers

For Manohar Ayalane & Co.
Chartered Accountants
FRN: - 116195W

(CA Manohar S. Ayalane)
MRN: - 100740
Partner
Place: - Camp at Latur
Date: - 09/07/2026

Scanned with OKEN Scanner

**AZAD MAHAVIDYALAYA,AUSA. DIST.LATUR**
**STATEMENT OF ACCOUNTS N.S.S. REGULAR ACTIVITIES 2025-2026**
**Acounting Period 01.04.2025 to 31.03.2026.**

**Statement of Receipts & Payments**

| Receipts | Amount | Amount | Payments | Amount | Amount |
|---|---|---|---|---|---|
| **To Opening Balance** | | | | | |
| Cash In hand | 0 | | By Refreshment Expenses | | 39010 |
| **Cash at Bank** | | | | | |
| SBI A/c No. 41740543165 | 0 | 0 | By Travelling Expenses | | 1400 |
| | | | By Honorarium Paid to Programme Officer | | 7200 |
| **To Grant In-Aid A/c** | | | | | |
| NSS Regular Grant 24-25 | 0 | | By Honorarium Paid to Guest | | 2000 |
| NSS Regular Grant 25-26 | 27000 | 27000 | | | |
| | | | By Audit Fees | | 1500 |
| **To Loans & Advances** | | | | | |
| NSS Special Camp | 26250 | | Misc. Expenses | | 5190 |
| Principal Loan A/c | 61500 | 87750 | | | |
| | | | By Office Expenses | | 1500 |
| To Interest Received A/c | | 0 | By Photo Expenses | | 3700 |
| | | | By F.Y.-2024-25 Grant Receivables A/c | | |
| | | | By NSS Special Camp Grant Receivabale | | |
| | | | **By Loans & Advances** | | |
| | | | Principal Loan A/c | | 53250 |
| | | | **By Closing Balance** | | |
| | | | Cash In hand | 0 | |
| | | | **Cash at Bank** | | |
| | | | SBI A/c No. 41740543165 | 0 | 0 |
| **Total** | | **114750** | **Total** | **0** | **114750** |

**(PRINCIPAL)**

**(PROGRAMME OFFICER)**

"Complied & constructed from the books of accounts & other records produced & according to the explanation & information offered in support thereto & as per our Report of even date & found to be in confiramation therewith"

Place: Latur
Date: 09/07/2026

MANOHAR AYALANE & CO. NANDED FRN NO. 116195W Chartered Accountants

For Manohar Ayalane & Co.,
Charterd Accountants
FRN No.116195W

CA Manohar Ayalane
Partner
M.No.100740

Scanned with OKEN Scanner

## विद्यापीठाने महाविद्यालयाकडून रासेयोचे लेखे स्वीकारण्याकरिता विहित नमुना

वित्तीय वर्ष ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ विवरण पत्र

**'अ' नियमित कार्यक्रम**

१. महाविद्यालयाचे नांव:- आझाद महाविद्यालय औसा जि. लातूर.

२. प्राचार्यांचे नांव :- डॉ. अफसर नवाबोद्दीन शेख.

३. कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव:- 1) डॉ मजहर एम कोतवाल 2) डॉ. तोटे डी. एस.

४. महाविद्यालयाची पदवी स्तरापर्यंतची एकूण विद्यार्थी संख्या:-

५. विद्यापीठाने नियमित कार्यक्रमाकरीता मंजूर केलेली विद्यार्थी संख्या :- 150

६. प्रत्यक्षात नोंदणी केलेली विद्यार्थी संख्या
(वर्ग व विद्याशाखा निहाय यादी जोडावी) :- पुरुष 75 स्त्री 75

७. १२० तास काम पूर्ण केलेल्या विद्यार्थी संख्या
(वर्ग व विद्याशाखा निहाय यादी जोडावी) :- पुरुष — स्त्री —

८. चालू वित्तीय वर्षासाठी मंजूर विद्यार्थ्यांकरिता
एकूण अनुज्ञेय अनुदान :- रुपये /- 54000/-

९. महाविद्यालयाकडे मागील वर्षाची अंतिम शिल्लक :- रुपये /- निरंक

१०. महाविद्यालयाला विद्यापीठाकडून चालू वर्षी
मिळालेले एकूण अनुदान :- रुपये /- 27000/-

११. संकिर्ण जमा
(व्याज, कालबाह्य उपकरणे निकाली काढल्यामुळे जमा
झालेली रक्कम इत्यादी) :- रुपये /- निरंक

१२. चालू वित्तीय वर्षात रासेयोखाली महाविद्यालयाकडे
एकूण उपलब्ध झालेली रक्कम :- रुपये /- 27000/-
चालू वित्तीय वर्षी महाविद्यालयांनी केलेला खर्च :-

अ) **प्रशासकीय स्तरावरील खर्च :-**

१) मानधनावरील खर्च :- रुपये /- 7200/-

२) कार्यालयीन खर्च :- रुपये /- 3000/-
(टायपिंग, पास्टेज, ऑफ इ. खर्च)

एकूण (अ) :- रुपये /- 10200/-

MANOHAR NYALANE & CO. NANDED FRN NO. 116194W Chartered Accountants

Scanned with OKEN Scanner

ब ) कार्यक्रमावर खर्च :-

| | | |
|---|---|---|
| १) | प्रवास खर्च :- | रुपये /- 1400/- |
| २) | अल्पोपाहारावरील खर्च :- | रुपये /- 39010/- |
| ३) | अत्यावश्यक बाबी, साहित्य खरेदी खर्च :- | रुपये /- निरंक |
| ४) | फोटो खर्च :- | रुपये /- 3700/- |
| ५) | पाहुणे मानधन खर्च :- | रुपये /- 2000/- |
| ६) | शिबीर पूर्व तयारी खर्च :- | रुपये /- निरंक |
| ७) | अन्य किरकोळ खर्च | रुपये /- 5190/- |
| | एकूण (ब) :- | रुपये /- 51300/- |
| | एकूण खर्च ( अ ब ) :- | रुपये /- 81500/- |

१३. महाविद्यालयाकडील अंतिम शिल्लक :-

| | | |
|---|---|---|
| अ) | बँक खाते क्रमांक :- (SBI 41740543165) | रुपये /- निरंक |
| ब) | रोकड :- — | रुपये /- निरंक |

प्रमाणित करण्यात येते की, वरील सर्व माहिती मी व्यक्तीश: पडताळून पाहिली व ती बरोबर आहे.

कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

MANOHAR AYALANE & CO. Chartered Accountants NANDED FRN NO. 116195W

For Manohar Ayalane & Co.,
Chartered Accountants
FRN No.116195W
CA Manohar Ayalane
Partner
M.No.100740

सनदी लेखापालची सही व शिक्का
( चार्टर्ड अकाऊंटंट )

प्राचार्य
Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

# आझाद महाविद्यालय, औसा. त.औसा जी.लातूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# नियमित कार्यक्रम अहवाल 2025-26

**प्रा.डॉ.शेख अफसर नवाबोद्दिन**

**प्राचार्य**

उपप्राचार्य

प्रा.डॉ.अचोले पी.बी.

**रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी**

प्रा.डॉ. कोतवाल एम.एम.

प्रा.डॉ.तोटे डी.एस.

सर्व धर्म समभाव सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी, स्वयं शिस्त, स्वाभिमान, स्वावलंबन, राष्ट्र भावना हे गुण व्यक्तीच्या आयुष्याचं सोनं करतात राष्ट्रीय सेवा योजनेतून विध्यार्थ्यांचे संघटन कौशल्य विकसित होण्यास मदत होते. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे शाश्वत साधन मानले गेले आहे.

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना राष्ट्रीय घटकात व प्रवाहात सामावून घेण्याची प्रक्रिया होय. समाजाचे काहीतरी देणे लागतो हि भावना तसेच आयोजित विविध स्पर्धेमुळे आत्मविश्वास वृद्धिगत होऊन स्वतःला सिद्ध करून एखाद्या क्षेत्रात उत्तम करियर करण्याचे धाडस याच काळात स्वयं सेवकात निर्माण होते. चर्चासत्र बौद्धिक व्याख्यानातून विचाराचे अभिजात, निश्चयी आणि संयमी स्वरुपाची होण्यास मदत होते. देशातील युवाशक्तीत नवचेतना देण्याचे कार्य हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे. युवकाचे प्रभावी व्यक्तिमत्व घडविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे होते. प्रभावी व्यक्तिमत्व घडवत असताना तरुणांमध्ये सामाजिक बांधीलकीची जाण व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमाद्वारे होते

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सांगताना त्याच सेवा आणि त्याग हे शब्द युवकाच्या आयुष्यातील सेवेचे महत्त्व विशद करतात, शिक्षण क्षेत्रात सेवा संस्कार तरुणावर व्हावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना उच्च शिक्षण क्षेत्रात उपक्रम राबविले जात आहे. राष्ट्रीय सेवा योजना हि महाविद्यालय व समाज यांतील अर्थपूर्ण दवा आहे

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ओळखले होते की युवकांच्या सहभागाशिवाय खेड्याची व समाजाची उन्नती होणार नाही. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना अशा कामांमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करणे, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय पुनर्बाधणी व राष्ट्रीय उत्कर्ष हा यशस्वीपणे जागृत करून त्याचा वापर राष्ट्रीय ताकद म्हणून करणे, त्याचबरोबर ग्रामीण समाजाची प्रगती साधने हि गरज आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे शिक्षक व युवक हे समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. या कार्यक्रमांतर्गत रोगप्रतिबंधक लसीकरण, हिमोग्लोबिन तपासणी इत्यादी डॉक्टरकडून करण्यात आली तसेच वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती रॅली, मार्गदर्शन, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता, रांगोळी स्पर्धा, व्यक्तिमत्व विकास, वाहतूक नियंत्रण, व्यसनमुक्ती अपारंपारिक ऊर्जा स्तोत्र, हुंडाबळी, वनसंवर्धन, जलसंवर्धन महिला विषयी कायदे, आपत्ती व्यवस्थापन, ब्लड बँक शिबिरे इत्यादी कार्यक्रम महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाकरिता आयोजित करण्यात आलेले आहेत.

Scanned with OKEN Scanner

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम :**

**दिनांक 8 एप्रिल ते 14 एप्रिल 2025**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड. संलग्नित,**

हिन्दुस्थानी एज्युकेशन सोसायटी,औसा द्वारा संचलित

# आझाद महाविद्यालय, औसा.

यांच्या संयुक्त विद्यमाने

**राष्ट्रीय सेवा योजना** Not Me But You



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर
## सामाजिक समता सप्ताह

आझाद महाविद्यालय औसा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम अंतर्गत आज 'भारतीय संविधानाची उद्देशिका'या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.मन्सूरअली इनामदार उपस्थित होते

त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाची उद्देशिका तसेच समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, मूलभूत अधिकार व कर्तव्ये इत्यादी बाबींची तपशीलवार माहिती दिली. सामाजिक समता सप्ताह अंतर्गत महाविद्यालयाने आयोजित विविध स्पर्धांचा उल्लेख यांप्रसंगी हिंदी विभागाचे विभाग प्रमुख प्रोफेसर तनवीर जहागिरदार सर यांनी आपल्या प्रास्ताविके मध्ये मांडले.

कार्यक्रमाचे संचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दादासाहेब तोटे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. मजहर कोतवाल यांनी केले याप्रसंगी ,सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Scanned with OKEN Scanner

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनीही आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कार्यावर सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर स्टाफ सेक्रेटरी डॉ. आदित्य माने यांची यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन रा.से.यो.अधिकारी डॉ. मजहर कोतवाल यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. दादासाहेब तोटे यांनी मानले या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

## कार्यक्रमाची क्षणचित्रे







प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण येथील समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.शशिकांत आलटे आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक विचार व्यक्त करताना.







या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कार्यावर सखोल मार्गदर्शन करताना.

Scanned with OKEN Scanner

## दि. 12 -04-2025 निबंध स्पर्धा







दि. 12 -04-2025 रोजी सकाळी 11 वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलाविषयी केलेले कार्य' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली . विजेत्या स्पर्धकांना प्रमाण पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

## दि. 12 -04-2025 रोजी सकाळी 11 वाजता

## परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती


आज रोजी आझाद महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महामानव परमपूज्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण येथील समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.शशिकांत आलटे उपस्थित होते. त्याने आपल्या मार्गदर्शनामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक विचार व्यक्त करताना म्हणाले कीभारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रूढी आणि परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी अथक प्रयत्न बाबासाहेबांनी केले .यात इतिहास कालीन स्त्रियांची परिस्तिथीचा अभ्यास ,चिंतन,विविध लेख ,पुस्तके मधून लिखाण ,विविध आंदोलनामधून कार्य त्यांनी केले .एवढे सगळे करून बाबासाहेब थांबले नाहीत . या सगळ्याला एका कायद्यात बसवले तर ते अगदी सक्षमपणे महिलांना अधिकार मिळेल हे त्यांच्या मनाने घेतले यासाठी त्यांनी अत्यंत कठोर मेहनत घेऊन ,सर्व बारकावे तपासून , भविष्यातील वेध घेऊन "हिंदू कोड बिल "चा मसुदा लिहिला ज्याला तब्बल ४ वर्ष , १महिना व २६ दिवस लागले.


Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Scanned with OKEN Scanner

यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. [illegible] प्रा. [illegible] साहेब , राष्ट्रीय सेवा योजनेचे मार्गदर्शक प्रा.पांडुरंग अचोले उपस्थित होते प्रा. आर. [illegible] यांनी शेवटी या कार्यक्रमाचे आभार मानले.





[illegible]




Scanned with OKEN Scanner


# कार्यक्रमाची क्षणचित्रे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह कार्यक्रम अंतर्गत दिनांक 9 एप्रिल 2025 'भारतीय संविधानाची उद्देशिका'या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.






'भारतीय संविधानाची उद्देशिका'या विषयावरव्याख्यान देताना इंग्रजी विभागाचे डॉ.मन्सूरअली इनामदार .त्यांच्यासोबत मंचावर उपस्थित प्रोफेसर तनवीर जहागीरदार






'भारतीय संविधानाची उद्देशिका'या विषयावरव्याख्यान देताना हिंदी विभागाचे विभाग प्रमुख व इतर मान्यवर त्यांच्यासोबत मंचावर उपस्थित इतर मान्यवर.

Scanned with OKEN Scanner


## आझाद महाविद्यालया मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी.

आज दिनांक 11 एप्रिल 2025 रोजी ठीक 11वाजता महाविद्यालयामध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.


महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.तसेच आपल्या छोटेखानी मार्गदर्शनात त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचे वर्णन करताना सांगितले की फुले हे महान आणि क्रांतिकारी समाजसुधारक आहेत, त्यांनी अस्पृश्यता, जातीव्यवस्थेसाठी तत्कालीन सामाजिक रोष पत्करुन लढा दिला आणि तो यशस्वी केला. ते थोर समाजसुधारक होते म्हणूनच त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना महात्मा ही उपाधी देण्यात आली आहे.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.मझहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे तसेच उपप्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले,सर्व शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन केले.







क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना उपस्थित डॉ.मझहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे. उपप्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले व कर्मचारी व विद्यार्थी

Scanned with OKEN Scanner

# शिवराज्याभिषेक सोहळा

दि. 06 जून 2025

आज 6 जून 2025 रोजी छत्रपति शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा आझाद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. मजहर कोतवाल यांनी सांगितले की दरवर्षीप्रमाणे यंदाही तारखेनुसार ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जात आहे. यंदा राज्याभिषेकाचे ३५२ वे वर्ष पूर्ण होत आहे. महाराष्ट्राचे आराध्यदैवत मानले जाणाऱ्या शिवछत्रपतींच्या राज्याभिषेक दिनी आपणही महाराजांचे विचार स्मरणात व आचरणात आणून त्यांना मानाचा मुजरा करू शकता.आजच्या दिवशी शिवाजी महाराज विधीपूर्वक छत्रपती झाले आणि मराठा साम्राज्याच्या स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली.त्यांनी बालपणापासूनच राजकारण, युद्धशास्त्र आणि लोकसेवा यांचा अभ्यास केला होता. म्हणूनच आजही त्यांना जगातील महान योद्ध्यांपैकी एक मानले जाते.

या प्रसंगी हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष मा.प्रा.संजय कुलकर्णी प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस.के. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.मजहर कोतवाल राष्ट्रीय सेवा योजनेचे सलाहकार व उपप्राचार्य डॉ. पांडुरंग आचोले तसेच प्रा. श्रीधर पाटिल, डॉ. आदित्य माने सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राध्यापक श्रीधर पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# शिवराज्याभिषेक सोहळ्याची छायाचित्रे




शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा.संजय कुलकर्णी प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस.के




शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.प्रा.संजय कुलकर्णी प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस.के व सर्व शिक्षक बांधव

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. 21/06/2025

आज आझाद महाविद्यालय औसा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ लदाफ एस. के. व क्रीडा संचालक डॉ. आदित्य माने तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मजहर कोतवाल डॉ.तोटे डी. एस. उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. आदित्य माने यांनी केले आपल्या प्रास्ताविकेमध्ये डॉ. आदित्य माने यांनी योगाचे महत्त्व विशद करताना सांगितले की आंतरराष्ट्रीय योग दिन हा दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जाणारा एक जागतिक आरोग्य कार्यक्रम आहे. या दिवशी, विविध स्थानिक आणि जागतिक समुदाय योगाभ्यासाच्या असंख्य फायद्यांबद्दल जागरूकता निर्माण करने हा उद्देश आहे.

या कार्यक्रमासाठी योग प्रशिक्षक म्हणून अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. श्याम पाडे यांनी योग सामाजिक आरोग्यासाठी आणि स्वतःसाठी किती महत्त्वाचा आहे, याचे महत्त्व सांगताना सांगितले की, योग ही एक प्राचीन मन आणो शरीर यांना विश्रांती देणारी थेरपी आहे जी भारतात उगम पावली. विविध अभ्यासांनी योगाचे नैराश्य, थकवा आणि आरोग्याशी संबंधित समस्या दूर होऊ शकतात. तुम्हाला जर तुमची जीवनशैली उत्कृष्ट हवी असेल तर आपल्या आयुष्यात योगाचा समावेश करून घ्या. योगा केल्यामुळे आपलं शरीर नेहमी निरोगी आणि चांगलं राहातं. योगासनामुळे आरोग्य निरोगी राहातं आणि हे नेहमीच मानण्यात आलं आहे. इतकंच नाही तर मानसिक तणावात असाल तर तुम्हाला योगाचा नक्कीच फायदा करून घेता येतो.

शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. तोटे डी. एस. यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी ,विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# आंतरराष्ट्रीय योग दिन




प्रभारी प्राचार्य डॉ लदाफ एस. के. व क्रीडा संचालक डॉ. आदित्य माने मार्गदर्शन करताना




अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. श्याम पाडे योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवीत असतानाचे छायाचित्र

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती

**दिनांक 23 जुलै 2025**

दिनांक 23 जुलै 2025 रोजी आझाद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक** यांची जयंती साजरी करण्यात आली सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.लदाफ एस.के यांनी टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले यांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लदाफ सर यांनी सांगितले की,लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे एक भारतीय स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक, समाजसुधारक आणि उत्तम लेखक होते. त्यांना **"भारतीय असंतोषाचे जनक"** म्हणून ओळखले जाते. **"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच"** ही त्यांची प्रसिद्ध घोषणा सर्वांना माहीतआहे.तसेच लोकमान्य टिळकांनी लोकांच्या समस्या समजून घेण्यासाठी आणि आपल्या हक्कांसाठी लढा देता यावा यासाठी 1881 मध्ये केसरी आणि मराठा या दोन वृत्तपत्रांची सुरूवात केली आणि त्यातून अन्यायाविरूद्ध वाचा फोडली.भारतीय इतिहास, संस्कृती आणि हिंदू धर्म यावर अनेक पुस्तके लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी लिहिली. टिळकांचा संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मयाचा सखोल अभ्यास होता. त्यामुळे त्यांचे विचार आज जयंती निमित्त सर्वांनी आचरणात आणले पाहिजे.


या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.मजहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी डॉ. तोटे डी.एस. यांनी सर्वांचे आभार मानले.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती




फलक लेखन




लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना प्राचार्य डॉ.एस.के.लदाफ व विद्यार्थीनी

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner




लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करताना उप प्राचार्य डॉ.पांडुरंग अचोले व सर्व शिक्षक कर्मचारी




लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करताना उप प्राचार्य व सर्व शिक्षक कर्मचारी

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner




लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करताना कार्यक्रमाधिकारी डॉ.मजहर कोतवाल डॉ.तोटे डी.एस.व सर्व शिक्षक कर्मचारी




लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करताना सर्व शिक्षक कर्मचारी

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa




योगाचे प्रात्यक्षिक करताना सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी



योगाचे प्रात्यक्षिक करताना सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

Principal
Azad Mahavidyalay
Ausa, Dist. Latur.

# अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी

दि.01/08/2025

औसा येथील आझाद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गुरुवारी दिनांक 01/08/2025 रोजी अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रथमतः प्राचार्य डॉ. लदाफ एस.के. आणि उप प्राचार्य राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सल्लागार प्रा.डॉ. पांडूरंग आचोले व प्रा.डॉ. दिलीप भोगे यांच्या हस्ते अण्णाभाऊच्या व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्याना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. दिलीप भोगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील योगदानाची ओळख करुन देत त्यांच्या सामाजिक जीवन कार्याची माहिती सर्वा समोर विविध प्रसंगाद्वारे सांगितली.अध्यक्षीय समारोपात प्राचार्यांनी अण्णाभाऊंच्या विपूल व दर्जेदार साहित्यीक लेखनावर विस्तृत प्रकाश टाकत लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य चळवळीत दिलेल्या योगदानाची माहिती सांगितली. या दोन्हीं महापुरुषांचे प्रेरणादायी विचार आपण सर्वांनी आत्मसात केले पाहिजेत असेही ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा.डॉ. पांडुरंग आचोले यांनी तर आभार प्रा. मजहर कोतवाल यांनी मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
Azad Mahavidyalaya

Scanned with OKEN Scanner

अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी




अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त मार्गदर्शन पर माहिती देताना डॉ.मजहर कोतवाल




अण्णाभाऊच्या व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना प्राचार्य डॉ.लदाफ एस.के. व शिक्षक कर्मचारी

Programme Officer

Scanned with OKEN Scanner




अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली.




या प्रसंगी डॉ. दिलीप भोगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील योगदानाची ओळख करुन देत असताना

Programme Officer
National Service Scheme
Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# वृक्ष संवर्धन व परिसर स्वच्छता

दि. 21ऑगस्ट 2025

**आझाद महाविद्यालयामध्ये वृक्ष संवर्धन व परिसर स्वच्छता .**

**दि.21ऑगस्ट 2025 रोजी** आझाद महाविद्यालय औसा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने परिसर स्वच्छता व झाडे लावा झाडे जगवा जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विशेषतः मुलींनी हातात झाडू घेऊन सर्व परिसराची स्वच्छता व साफसफाई केली व झाडांना जगविण्यासाठी आले तयार करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एस के.लदाफ सर व उपप्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे परिसराची साफसफाई केली, याप्रसंगी वृक्ष जतन करणे ही काळाची गरज आहे. आपल्याला झाडांपासून प्राणवायू मिळतो. त्यामुळे आपला प्रभाग व आजूबाजूचा परिसर, स्वच्छ व हिरवा राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील असणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ़ सर यानी केले.

परिसर स्वच्छता व वृक्ष संवर्धन बाबत जनजागृती निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवकांनी जनजागृती रॅली काढली.

या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मजहर कोतवाल व डॉ.तोटे डी एस व सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner




परिसर स्वच्छता व वृक्ष संवर्धन बाबत जनजागृती निर्माण व्हावी यासाठी जनजागृती रॅली काढण्यात आली .




राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी हातात झाडू घेऊन सर्व परिसराची स्वच्छता व साफसफाई केली

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner




परिसराची स्वच्छता व साफसफाई केली व झाडांना जगविण्यासाठी आले तयार करण्यात आले.



या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस. के उप प्राचार्य डॉ.अचोले पी.बी. व महाविद्यालयातील सर्व शिक्षक बांधव विद्यार्थी विद्यार्थिनीनी

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# रक्तदान शिबीर

दिनांक 25/08/2025

औसा येथील आझाद महाविद्यालयामध्ये विश्व बंधुत्व दिवस निमित्ताने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय संस्था शाखा औसा व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी रक्तदान केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य लदाफ एस. के. यांनी या दिनाचे औचित्य साधून रक्तदानाचे महत्व विषद केले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मजहर कोतवाल डॉ. तोटे डी.एस. व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराची छायाचित्रे




Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner



रक्दान शिबिरामध्ये रक्तदान करताना विद्यार्थी व प्रभारी प्राचार्य डॉ.लदाफ एस.के




रक्दान शिबिरामध्ये रक्तदान करताना विद्यार्थी व प्रभारी प्राचार्य डॉ.लदाफ एस.के

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner



रक्दान शिबिरामध्ये रक्तदान करताना विद्यार्थी व प्रभारी प्राचार्य डॉ.लदाफ एस.के




रक्दान शिबिरामध्ये रक्तदान करताना विद्यार्थी व प्रभारी प्राचार्य डॉ.लदाफ एस.के

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya

Scanned with OKEN Scanner

# शिक्षक दिवस

**दि. 06 सप्टेंबर 2025**

## आझाद महाविद्यालयामध्ये शिक्षक दिवस साजरा.

आज **दि. 06 सप्टेंबर 2025** रोजी आझाद महाविद्यालयांमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ' शिक्षक दिवस' म्हणून साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस. के. यांनी राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा केला जातो. शिक्षकांच्या योगदानाला आदराने गौरवण्यासाठी आणि भावी पिढ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे. भारताचे दुसरे राष्ट्रपती, तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. शिक्षक दिन हा शिक्षकांनी ज्ञान आणि मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केलेल्या योगदानाला आदराने स्वीकारण्याचा दिवस आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळते.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मजहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक बांधव विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner

# शिक्षक दिवस

दि. 06 सप्टेंबर 2025

## आझाद महाविद्यालयामध्ये शिक्षक दिवस साजरा.

आज **दि. 06 सप्टेंबर 2025** रोजी आझाद महाविद्यालयांमध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ' शिक्षक दिवस' म्हणून साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस. के. यांनी राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा केला जातो. शिक्षकांच्या योगदानाला आदराने गौरवण्यासाठी आणि भावी पिढ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा आहे. भारताचे दुसरे राष्ट्रपती, तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. शिक्षक दिन हा शिक्षकांनी ज्ञान आणि मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी केलेल्या योगदानाला आदराने स्वीकारण्याचा दिवस आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळते.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मजहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक बांधव विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner




**फलक लेखन**




महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस. के. यांनी राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur.**

Scanned with OKEN Scanner




महाविद्यालयातील सर्व शिक्षक बांधव विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित




महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. लदाफ एस. के व महाविद्यालयातील सर्व शिक्षक

बांधव विद्यार्थी विद्यार्थिनी

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa Dist. Latur.

Scanned with OKEN Scanner


# मराठवाडा मुक्तिसंग्राम व स्वा.रा.ती.म वर्धापन दिन दिन

**DATE : 17 -09- 2025**

हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटी, औसा यांच्या मुख्य प्रांगणात मराठवाडा मुक्तिसंग्राम व स्वा.रा.ती.म वर्धापन दिन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला .

या प्रसंगी युवा नेते, संस्था प्रतिनिधी मा.श्री.सुलेमानजी शेख यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले, तर स्वा.रा.ती.म विद्यापीठ नांदेड वर्धापन दिन निमित्त आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लदाफ एस.के. सर यांच्या शुभहस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि नागरिकांच्या उपस्थितीत देशभक्तीच्या वातावरणात हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला .




संस्था प्रतिनिधी मा. श्री. सुलेमानजी शेख यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले, तर स्वा.रा.ती.म विद्यापीठ नांदेड वर्धापन दिन निमित्त आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लदाफ एस.के. सर यांच्या शुभहस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner



मराठवाडा मुक्तिसंग्राम व स्वा.रा.ती.म वर्धापन दिन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि नागरिकांच्या उपस्थितीत देशभक्तीच्या वातावरणात हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रपिता महात्मा गांधी व
# माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती

**दिनांक : 2 ऑक्टोबर 2025**

आझाद महाविद्यालयामध्ये 2 ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली . या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली, तसेच उपप्राचार्य डॉ.पांडुरंग आचोले यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्पहार अर्पण केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ म्हणाले कि २ ऑक्टोबर हा दिवस भारताच्या इतिहासातील दोन महान व्यक्तिमत्त्वांना अभिवादन करण्याचा दिवस आहे. या दिवशी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती तसेच देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी केली जाते.

महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा आणि शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले. त्यांचे विचार आजही संपूर्ण जगाला प्रेरणा देतात. लालबहादूर शास्त्री यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेचा आदर्श निर्माण केला. **"जय जवान, जय किसान"** हा त्यांचा संदेश देशाच्या विकासात जवान आणि शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित करतो.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. मझहर कोतवाल यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist Latur

Scanned with OKEN Scanner

## कार्यक्रमाची छायाचित्रे




प्रभारी प्राचार्य डॉ. एस के लदाफ यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली




उपप्राचार्य डॉ.पांडुरंग आचोले यांनी लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुष्पहार अर्पण केले.

Scanned with OKEN Scanner




यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur**

Scanned with OKEN Scanner

# Azad Mahavidyalaya, Ausa.

## SURVEY REPORT

**2024-25**

| | |
|---|---|
| **Name of the Activity** | **Dr.Babaseb Ambedkar jayanti** |
| **Name of In-Charge/Coordinator/HOD/Chairman** | **N.S.S.** |
| **Date:** - 11 AND 12 OCTOBER 2025 | पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शेती व घरांचे झालेल्या नुकसानीचा सर्वे व मदतीचा अहवाल |

Report of Activity in Brief: -

पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शेती व घरांचे झालेल्या नुकसानीचा सर्वे रिपोर्ट व मदतीचा अहवाल

मुंबई येथील विलेपार्ले स्थित साठे महाविद्यालयाने शासनाच्या आदेशानुसार पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शेती व घरांचे नुकसान झाले आहे. अशा विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी औसा येथील आझाद महाविद्यालय दत्तक घेतले होते.

त्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य व हिंदुस्तानी एज्युकेशन सोसायटी औसा या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापकांचे चार पथक तयार करून 11 व 12अक्टोबर 2025 दोन दिवस पूरग्रस्त विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. या पाहणीमध्ये अतिवृष्टीमुळे शेतातील सर्व प्रकारचे पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पथकाने त्यांचे सांत्वन करून मदत करण्याचे आश्वासन दिले.

1 2 अक्टोबर 2025 रोजी आझाद महाविद्यालय औसा येथे संध्याकाळी सात वाजता साठे महाविद्यालय मुंबई येथील शिष्ट मंडळाने भेट दिली.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षण रिपोर्ट वर मदत म्हणून 112 विद्यार्थांना शैक्षणिक कीट प्रा. डॉ. अर्जुन टेकाळे व कांबळे मॅडम यांनी प्राचार्यांना भेट म्हणून दिली.

सर्वप्रथम महाविद्यालयाचे वतीने या दोघांचा प्राचार्य डॉ.ए क लदाफ यांनी शाल व पुष्पहार देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.मजहर कोतवाल यांनी केलेल्या सर्वेचा इतिवृत्त त्यांच्यासमोर सादर केला त्यांनी या केलेल्या कार्याचा कौतुक केला व सर्वोपरी मदत देण्याचे आश्वासन दिले.

पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे शेती व घरांचे झालेल्या नुकसानीचा सर्वे अहवाल







Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner



















ऑगस्ट - सप्टेंबर 2025 मध्ये लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाने विद्यार्थ्यांच्या शेतामध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur**

Scanned with OKEN Scanner
















औसा तालुक्यातील येळी, मुगळेवाडी, जावळी, वाघोली, चलबुर्गा, फतेपूर या अतिवृष्टी भागाचा दौरा

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

Principal
Azad Mahavidyalay
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner



















औसा तालुक्यातील मोजे भादा, भेटा, आंदोरा येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांची पाहणी करून सर्वे रिपोर्ट तयार केला

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner


















औसा तालुक्यातील मोजे भादा, भेटा, आंदोरा सतधरवाडी, वडजी येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांची पाहणी करून सर्वे रिपोर्ट तयार केला

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur**

Scanned with OKEN Scanner



















औसा तालुक्यातील मोजे उजनी, सिंदाला, तावशी,एकम्बीवाडी बोरफळ येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांची पाहणी

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist Latur

Scanned with OKEN Scanner












औसा तालुक्यातील मोजे उजनी, सिंदाला, तावशी,एकम्बीवाडी बोरफळ येथील पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शेतामध्ये अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांची पाहणी

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist Latur

Scanned with OKEN Scanner

पूरग्रस्त विद्यार्थ्यांना साठये महाविद्यालय,विलेपारले, मुंबई यांच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप




पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमामध्ये प्रा. डॉ. अर्जुन टेकाळे व कांबळे मॅडम व प्राचार्य







पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना दन वेगवेगळ्या कार्यक्रमात शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

Scanned with OKEN Scanner







पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आलेल्या शैक्षणिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय मतदान जनजागृती कार्यक्रम

**दिनांक 23 जानेवारी 2026**


आझाद महाविद्यालय औसा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आज राष्ट्रीय मतदान जागृती दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य एस.के.लदाफ सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय निवडणूक आयोगाबाबत साविस्तर माहिती दिली.लोकशाहीत मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व काय आहे, तो हक्क बजावल्याने काय परिणाम होऊ शकतो, मतदारांची भूमिका कशी महत्त्वाची ठरु शकते याबद्दल नागरिकांमध्ये जागरुकता करण्यासाठी दरवर्षी 25 जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. जगातली सर्वात मोठी लोकशाही अशी ओळख असलेल्या भारताची लोकशाही व्यवस्था टिकवण्यासाठी मतदान कसं महत्वाचं आहे हे या दिनाच्या निमित्ताने सांगितलं जातं. नागरिकांनी आपल्या मताचा योग्य प्रकारे वापर केला तर योग्य प्रतिनिधी निवडून जाऊ शकतात आणि त्या माध्यमातून लोकशाही बळकट होऊ शकते. मतदानाच्या हक्काचा वापर करत देशातील नागरिक त्यांच्या भविष्यासाठी योग्य अशा प्रतिनिधीची निवड करु शकतील.

तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख क्षीरसागर डी.डी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की भारत निवडणूक आयोगामार्फत दरवर्षी 25 जानेवारी हा दिवस 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून साजरा केला जातो. या विशेष दिनानिमित्त 20 जानेवारीपासून जिल्हा प्रशासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुकास्तरावर तसेच जिल्ह्यातील मोठ्या लोकसंख्येच्या गावात प्रभातफेरी आयोजन, जिल्ह्यातील विविध महाविद्यालये व ज्युनियर कॉलेज मधून युवक-युवतींसाठी मतदान करणे का गरजेचे या विषयावर प्रबोधन करणारी व्याख्याने, निबंध स्पर्धा, शाहीरांच्या पोवाड्यातून जनजागरण आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विशेषत: 18 वर्षे पूर्ण केलेल्या युवक-युवतींना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे या अनुषंगाने मतदान जागृती बाबत तरूणाईने जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा असे आवाहन या प्रसंगी केले. या दिना निमित्त सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञा घेतले शेवटी प्राध्यापक कोतवाल एम. एम.यांनी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur**

Scanned with OKEN Scanner




प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख क्षीरसागर डी.डी. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.




प्राचार्य एस.के.लदाफ सर यांनी, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय निवडणूक आयोगाबाबत सविस्तर माहिती व शपथ दिली.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

# रक्तदान शिबीर

दिनांक 13 फेब्रुवारी 2025

औसा येथील आझाद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व माऊली ब्लड बँक लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 13 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

सर्वप्रथम महाविद्यालयाच्या वतीने माऊली ब्लड बँकच्या सर्व टीमचा सत्कार करण्यात आला. पंचायत समितीचे सदस्य श्री परमेश्वर लांडगे डॉ. रोहिणी कातळे श्री. परमेश्वर सुरवसे, डॉ.आकांक्षा साबळे, स्नेहल कांबळे व इतर मान्यवरांचा प्राचार्य डॉ लदाफ एस के उप प्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेविक कु.इनामदार बाहोद्दीन, जाधव अविनाश व इतर  हस्ते पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

पंचायत समिती सदस्य श्री परमेश्वर लांडगे यांच्या हस्ते नारळ फोडून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माऊली ब्लड बँकच्या डॉ. रोहिणी कातळे विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व सांगताना म्हणाले कि रक्तदान हे जगातले सर्व श्रेष्ठ दान आहे. कारण यामुळे एखाद्या संकटात असलेल्या व्यक्तीला नवीन जीवन मिळू शकते. मानवी रक्ताची निर्मिती कारखान्यात करता येत नाही, ते केवळ दुसऱ्या मानवाकडूनच मिळू शकते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते. अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे पेशंटचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचण्यास रक्तदान महत्वाचे कार्य करते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ लदाफ एस के उप प्राचार्य डॉ. पांडुरंग अचोले ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.मजहर कोतवाल डॉ. आदित्य माने, डॉ. डी. एस. तोटे, पुजारी सर सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**Programme Officer**
**National Service Scheme**
**Azad Mahavidyalaya, Ausa**

**Principal**
**Azad Mahavidyalaya**
**Ausa, Dist. Latur**

Scanned with OKEN Scanner

# रक्तदान शिबीर छायाचित्रे




माऊली ब्लड बँक लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 13 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.




रक्तदान शिबीर छायाचित्रे

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

# श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती

दिनांक : 19 फेब्रुवारी 2026

## आझाद महाविद्यालयामध्ये शिवजयंती साजरी.

औसा येथील आझाद महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागातर्फे रयतेचा जाणता राजा श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ .दिलीप क्षीरसागर व इतिहास विभाग प्रमुख डॉ. एस. बी. शेख तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. लदाफ व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून पुष्पहार अर्पण केले.


डॉ दिलीप क्षीरसागर यांनी आपल्या संबोधनात शिवाजी महाराजांच्या कल्याणकारी राज्य व धार्मिक सहिष्णुतेवर विस्तृत विवेचन केले. डॉ.शेख एस.बी. यांनी शिवाजी महाराजांची जीवनकथा त्यांची दूरदृष्टी, शौर्य आणि नेतृत्वाची उदाहरणे देत त्यांच्या अतुलनीय कार्याचा इतिवृत्त मांडला.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. एस. के. लदाफ यांनी सांगितले की शिवाजी महाराजांनी किनारपट्टीच्या रक्षणासाठी नौदलाच्या वर्चस्वाचे महत्त्व ओळखून त्यांनी एक मजबूत नौदल दल स्थापन केले. त्यांच्या प्रशासकीय सुधारणांमध्ये शिस्तबद्ध लष्करी रचना निर्माण करणे, महसूल सुधारणांचा परिचय आणि व्यापाराला चालना देणे यांचा समावेश होता. त्यांनी धार्मिक सहिष्णुतेवरही भर दिला. शेवटी डॉ. श्रीधर पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. पांडुरंग आचोले राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.मजहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे, सांस्कृतिक विभागाचे डॉ. मन्सूरअली इनामदार तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner




या कार्यक्रमास इतिहास विभाग प्रमुख डॉ. एस. बी. शेख

मार्गदर्शन करताना





कार्यक्रमाधिकारी डॉ.मजहर कोतवाल डॉ. दादासाहेब तोटे, सांस्कृतिक विभागाचे डॉ. मन्सूरअली इनामदार तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Programme Officer
National Service Scheme


Principal
Azad Mahavidyalaya
Ausa, Dist. Latur

Scanned with OKEN Scanner

# कार्यक्रमाची छायाचित्रे




प्रभारी प्राचार्य डॉ. एस. के. लदाफ व्यासपीठावर उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पूजन करून पुष्पहार अर्पण केले.




या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ .दिलीप क्षीरसागर मार्गदर्शन करताना

Programme Officer
National Service Scheme
Azad Mahavidyalaya, Ausa

Scanned with OKEN Scanner